# जिल्हा TODAY

**अल्बाट्रॉस**

माझे नाव अल्बाट्रॉस. जरा वेगळे वाटले ना? जगातील सर्वांत लांब पंखांचा पक्षी अशी माझी ओळख आहे. पंख पसरल्यावर माझा आकार सुमारे ११ ते १२ फूट होतो. माझे वजन सुमारे १० किलो आहे. प्रशांत महासागराच्या दक्षिण आणि उत्तर भागात माझे वास्तव्य असते...

फुल्ल टू स्मार्ट

स्पर्धेचे कूपन... पान ९

# मूलस्थानी जलसंधारणाचा पहिला टप्पा यशस्वी

## बारामती अॅग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट व कृषी विभागाचा पुढाकार; तालुक्यातील ३६ गावांतील शेतकऱ्यांमध्ये जागृती मोहीम

बारामती, ता. २ : बारामती अॅग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टने सुरू केलेल्या मूलस्थानी जलसंधारणाच्या मोहिमेचे दृश्य परिणाम येथे पडलेल्या पहिल्या पावसातच दिसले आहेत. सलग समान पाणी साचण्याचा फायदा या पद्धतीमुळे झाल्याचे शेतकऱ्यांनी अनुभवल्याने जलसंधारणाचा पहिला टप्पा यशस्वी झाला आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब साचून राहावा व त्या ओलाव्यावर किमान रब्बी ज्वारीची पिके तरी घेता यावीत यासाठी कृषी विभाग, महात्मा फुले कृषी विद्यापीठ व बारामती अॅग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने बारामती तालुक्यातील ३६ गावांत मूलस्थानी जलसंधारणाविषयी शेतकऱ्यांना जागृत करण्याची मोहीम सुरू आहे. ही मोहीम अद्याप सुरू आहे. परंतु लोणी भापकर येथून सुरवात झालेल्या या मोहिमेत शेतात उभे आडवे चर घेऊन सऱ्या काढल्यास पाणी सलग समतल साचून राहण्यात मदत होते ही भूमिका शेतकऱ्यांना पटवून देण्यात आली. या मार्गदर्शनानंतर जोगवडी, मोरगाव, मुर्टी, लोणी भापकर, जवळार्जुन, पानसरेवाडी, उंडवडी, कऱ्हावागज आदी गावांत शेतकऱ्यांनी ज्वारीसाठी नांगरून ठेवलेल्या जमिनीमध्ये उभे आडवे चर घेऊन सऱ्या पाडल्या. दोन दिवसांपूर्वी बारामती तालुक्यात काही गावांमध्ये पाऊस झाला. काही ठिकाणी भरपूर, तर काही ठिकाणी मध्यम पाऊस झाला. वरील गावांपैकी ज्या ठिकाणी शेतकऱ्यांनी मूलस्थानी जलसंधारणाचा प्रयोग केला, तेथे एकसमान पाणी शेतात साचले तर ज्या ठिकाणी केवळ नांगरट केलेल्या जमिनी आहेत, तेथे पाणी एक तर उताराच्या भागात एकाच ठिकाणी साचले व काही ठिकाणी बांध फोडून पाणी वाहून गेले. मूलस्थानी जलसंधारणाचा प्रयोग करण्यामागे बारामती अॅग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे प्रमुख राजेंद्र पवार यांची भूमिका होती. दुष्काळी परिस्थितीत खरिपाची पिके हातची गेल्याने मशागतीचा खर्च व वर्षभराचा कुटुंबाचा खर्च यामध्ये शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे. त्यांना किमान रब्बीचे पीक तरी घेता यावे व वर्षभराचे अन्नधान्याचे उत्पादन घेता यावे या पावसाचे पाणी जमिनीत जिरवल्यास त्याच्या ओलाव्यावरच

पान २ वर »



शारदानगर (ता. बारामती) : येथे झालेल्या मूलस्थानी जलसंधारणाच्या प्रयोगातून केलेल्या उभ्या आडव्या वाफ्यांमुळे सलग, समान पाणी साचले.